म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : ......
दा. क्र. : 6002

IRBK-0107002

ठा. ग्र. ६००२


म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६००२ नों. दि ..........
वि. ब्रा.वा. ..... क्र. ..................

अ. प्र. सं. ठाणे
बाळवाङ्मय
वा. नं. ८६०




IRBK-0107002

# संत ज्ञानेश्वर


शेकडो वर्षे झाली. महाराष्ट्रांतून लाखों लोक पंढरपूरला लोटतात. या यात्रेकरूंना वारकरी म्हणतात. ते भजन करतात – "ज्ञानोबा – तुकाराम." ज्ञानोबा म्हणजेच ज्ञानेश्वर. त्यांनीं वेदांतील ज्ञान मराठीत आणले म्हणून ते थोर. त्यांचीच ही गोष्ट.
पंढरीचा पांडुरंग कटीवर हात देऊन विटेवर उभा आहे.
आषाढी व कार्तिकी एकादशीला येथें मोठी यात्रा भरते. जागोजाग कीर्तनें चालतात भजनांचे फड पडतात. भक्त मंडळीं त्यांत रंगून जातात. तेथें संतांचे अभंग ऐकूं येतात. ज्ञानेश्वर हे एक मोठे संत होते.


जुन्या मोंगलाईत आपेगांवचे कुळकर्णी विठ्ठलाचे मोठे भक्त. हरिहर-पंत यांचा मूळ पुरुष. त्यांचा वंशज त्र्यंबक. हा फार विद्वान होता. यांचा नातू विठ्ठलपंत. हे ज्ञानेश्वरांचे वडील. यांना बुवा व्हावेंसें वाटे.
विठ्ठलपंतांनीं शिक्षण पुरें केलें. त्यांचें लग्नहि झालें. त्यांची बायको रुक्मिणी ही आळंदीचे सिधोपंत कुळकर्णी यांची मुलगी. लग्न करून ते आळंदीलाच राहिले.
तरीपण विठ्ठलपंतांचें मन संसारांत लागेना. त्यांना संन्यास घ्यावयाचा होता. एक दिवस ते 'गंगेवर जातों' म्हणून घरांतून निघाले.
तेथें इंद्रायणीला गंगाच म्हणतात. पण विठ्ठलपंतांच्या मनांत होती काशीची गंगा. ते थेट काशीला गेले. तेथें त्यांनी रामानंदस्वामी कडून संन्यास घेतला. त्यांचें नवें नांव झालें 'चैतन्याश्रम स्वामींना त्यांनीं सांगितलें कीं, आपलें लग्न झालेलें नाहीं. इकडे रुक्मिणीला तें समजलें. तिचेंहि मन संसारांतून उडालें. ती देवाची भक्ति करूं लागली. रामानंदस्वामी रामेश्वरला निघाले होते. वाटेंत ते आळंदीला थांबले


रुक्मिणी पिंपळाला प्रदक्षिणा घालायला आली होती. रामानंदस्वामी पारावर बसले होते; त्यांनीं आशीर्वाद दिला, "तुला मुलगा होईल." रुक्मिणी हंसली. स्वामींनीं तपास केला. ते रुक्मिणीला व सिधोपंतांना घेऊन काशीला परत गेले.
स्वामींनीं खोटें मागून फसविल्याबद्दल विठ्ठलपंतांना दोष दिला. सांगितलें "आतां घरीं परत जा. बायकोशीं सुखानें संसार कर. देवाची तुझ्यावर कृपा आहे." विठ्ठलपंतांनीं संन्यास टाकला. ते आपेगांवीं परत येऊन इतरांसारखे राहूं लागले. पण लोकांना तें आवडलें नाहीं. यानें धर्म बिघडतो, असें ते समजत. त्यामुळें ते विठ्ठलपंतांचा फार छळ करूं लागलें. त्यांना वाईटसाईट बोलूं लागले. त्यामुळें विठ्ठलपंत दुःखी झाले.


विठ्ठलपंतांना मुलेंहि झालीं. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई. मुलें होतीं पण संन्याश्याचीं !
तरीसुद्धां गांवच्या लोकांचा त्रास चालूच होता. विठ्ठलपंतांचीं मुले कुठें दिसलीं कीं लोक चेष्टेनें हंसत. त्यांना चिडवीत. रडवीत.
त्यामुळें गांवानें त्यांच्यावर बहिष्कार घातला. विठ्ठलपंतांनीं गांवाबाहेर झोंपडी बांधली. सर्वजण तेथेंच आनंदांत राहूं लागलीं.
ज्ञानदेव आतां मोठा झाला. मोठा म्हणजे पांच वर्षांचा. तरीपण त्याला पुष्कळ गोष्टी कळूं लागल्या होत्या. छोटी मुक्ता रडायला लागली कीं हा तिची समजूत घाली. पण विठ्ठलपंतांना तें पाहावेना. रुक्मिणीबाईनीं विठ्ठलपंतांना उपाय सुचविला: "आपण सर्व त्र्यंबकेश्वरला जाऊं. तिथें तुम्ही अनुष्ठान करा. त्र्यंबकेश्वर आपलें दुःख दूर करील." विठ्ठलपंतांना तो पटला.



निघालीं सर्वजण त्र्यंबकेश्वराला. सामानसुमान फारसें नव्हतेंच. दोन तीन गांठोडीं झालीं. रान तुडवीत, डोंगर ओलांडीत तीं चाललीं होतीं.
तों अचानक एक वाघ त्यांच्या अंगावर धांवून आला. जो तो वाट फुटेल तिकडे पळूं लागला. निवृत्ति एका गुहेंत शिरला.
आंत जाऊन पाहातो तों समोर एक तपस्वी. निवृत्तीनें नमस्कार करतांच त्यानें आशीर्वाद दिला.
ते गैनीनाथ होते. त्यांनीं त्याला आपल्या गुहेंत सात दिवस ठेवून घेतलें आणि योगी बनविलें. निवृत्तीचे निवृत्तिनाथ झाले. ज्ञानदेवांनीं यांनाच पुढें गुरु केलें. निवृत्ति सुखरूप येऊन वडिलांना भेटला. त्याचें नवें तेज पाहून ते मनाशीं म्हणाले, 'यांच्या मुंजी झाल्या-शिवाय काय उपयोग !' ते आपेगांवीं परतले. त्यांनीं ब्राह्मणांच्या विनवण्या केल्या. पण ते म्हणाले, "संन्याश्याच्या मुलांच्या मुंजी नाहीं होणार."


सुचेना. ते ब्राह्मण.
म्हणूं लागले, "निदान मला प्रायश्चित्त तरी द्या." तेव्हां ब्राह्मणांनी चिडून सांगितलें, "तुला प्रायश्चित्त नदींत बुडून मरणांचें!"
त्यांना तें खरेंच वाटलें.
आपण मेल्याने मुलें तरी सुखी होवोत ! नवरा-बायको दोघेंहि निघालीं.—कुठें ?
आपेगांवपासून खूप दूर प्रयाग शहर आहे. तिथें गंगा व यमुना नद्यांचा संगम आहे. तीं दोघें तिथ आलीं. आणि दिल्या उड्या झोकून त्या पवित्र संगमांत.
आईबापच नाहींसे झाले मुक्तेनें निवृत्तीच्या गळांमिठी घातली. ती ओक्साबोक्शी रडूं लागली. मग सगळ्यांनाच रडायला येऊं लागलें. रस्त्यांतून हिंडतांना तीं जाणारायेणाराकडे आपले आई-बाबा यांत भेटतील म्हणून आशेनें बघत. पण देवाघरीं गेलेले आईवडील त्यांना कुठून भेटायला! आपेगांवच्या लोकांना त्यांनीं विनविलें, "आम्हांला शुद्ध करून घ्या आमच्या मुंजी करा" तेव्हां त्यांनीं त्यांना पैठणला जायला सांगितलें.



म्हणून तीं मुलें पैठणला जायला निघालीं. काट्यां-दगडांतून, नद्यां-डोंगरांतून. पण पैठण खूप लांब होतें.
अखेर पैठण आलें. निवृत्ति-ज्ञानदेवांनीं दोघां भावंडांना बरोबर घेतलें. ते ब्राह्मणांच्या पुढाऱ्यांकडे गेले. हात जोडून म्हणाले. "आम्हांला शुद्ध करून घ्या. आमच्या मुंजी करा." "तुम्हीं संन्याश्याचीं मुलें ना! कांहीं होणार नाहींत तुमच्या मुंजी. शुद्धीहि नाहीं होणार तुमची." उत्तर मिळालें. "-शुद्धी करून काय रेड्याचा माणूस होतो!" कोणी-तरी कुचेष्टेनें म्हणाला. 'कां नाहीं होणार?' कोण बोललें म्हणून सगळ्यांनीं चमकून पाहिलें.


तेजस्वी ज्ञानदेवच तें बोलत होता- ''सगळ्यांच्या हृदयांत एकच परमेश्वर आहे.'' त्या कुटाळानें
समोरून चाललेल्या रेड्याला दोन चाबूक लगावले. पण ज्ञानदेवाची पाठ रक्ताळली. ''हाहि देवच ना ! मग ह्याला वेद म्हणायला,'' तो कुटाळ किंचाळला. ज्ञानदेवानें रेड्याच्या डोक्यावर हात ठेवला. रेडा खरो खरच वेद म्हणायला लागला.
तो चमत्कार पाहून लोक थक्क झाले. त्यांना त्या मुलांचें कौतुक वाटलें. त्यांनीं त्यांची मिरवणूक काढली.
मग तीं मुलें आपोआपच शुद्ध ठरलीं. पैठणांतच राहून विद्याभ्यास करूं लागलीं. ज्ञानदेवानें संस्कृत पोथ्या-पुस्तकांचा खूप अभ्यास केला.


ज्ञानदेव वयानें लहान. तरी तो ज्ञानानें खूप मोठा झाला.
तो प्रवचनें करूं लागला. 'भगवद्गीता' ग्रंथ तो लोकांना
समजावून देऊं लागला. लोकांना तें आवडलें. पटूं लागलें.
लोक त्याला मोठा म्हणूं लागले. त्या मुलांना वाटूं
लागलें आतां आजोळीं जावें. लगेच सर्व निघालीं
व आळंदीला आलीं त्यांची प्रसिद्धी
आळंदींतहि पोहोंचली होती. तिथेंहि
त्यांना मान मिळाला. पण—


आळंदींत त्यावेळीं विसोबा नांवाचा माणूस होता. मोठा मत्सरी. तीं रस्त्यांत दिसलीं कीं यांना खाऊं का गिळूं असें त्याला होई!
दसऱ्याचा सण होता. निवृत्तिनाथांना वाटलें आज मांडे खावेत. मुक्ता मांड्यांसाठीं खापर आणायला कुंभाराकडे गेली. वाटेंत विसोबा तिला भेटला. त्यानें एकटी पाहून तिला मारलें.
ती रडतरडतच कुंभाराकडे गेली. विसोबाहि आला. त्यानें कुंभाराला दरडावलें, "खबरदार हिला खापर विपर देशील तर!" कुंभार म्हणाला, "नाहीं, देवा नाहीं देत." मुक्ता हिरमुसली. तशीच घराकडे परतली. ज्ञानदेवांनीं विचारलें, "कां ग हिरमुसलीस?" तिनें हकीगत सांगितली. "हात्तिच्या एवढेंच ना!" ते हात टेकून ओणवे झाले. "कर माझ्या पाठीवर मांडे." त्यांच्या पोटांतला अग्नि जळूं लागला. तापल्या पाठीवर मांडे तयार होऊं लागले. विसोबानें तें पाहिलें. तो पस्तावला





हीं चारी भावंडें पुढें फिरत फिरत नेवाश्याला आलीं. गांवांत येतात तो कळलें कीं. गांवचा कुळकर्णी नुकताच वारला आहे. त्यांचें नांव होतें 'सच्चिदानंद.'

ज्ञानदेव हंसून म्हणाले. "'सच्चिदानंद' कसा मरेल!" ते त्या घरीं गेले. मेलेल्या त्या माणसावरून त्यांनीं हात फिरविला. माणूस जिवंत झाला. त्याच्या बायकोला फार आनंद झाला.








मग तीं नवराबायको ज्ञानदेवांच्या पायां पडलीं ज्ञानदेवांनीं तिथें एक मोठें पुस्तक लिहिण्याचें ठरविलें. सच्चिदानंद नें लिहून घेऊं लागले. 'ज्ञानेश्वरी' हें तें पुस्तक. फार पूर्वी कौरव-पांडवांची मोठी लढाई झाली. पांडवानला अर्जुन सुरवातीला बावचळला. त्याचा रथ श्रीकृष्ण हांकीत होते. त्यांनीं त्याला उपदेश केला. तीच 'भगवद्गीता.' तिचा अर्थ मराठी भाषेंत सोपा करून सांगितला ज्ञानदेवांनीं तीच ज्ञानेश्वरी ही लिहिली तेव्हां ज्ञानदेवांचे ज्ञानेश्वर झाले.




विठ्ठलपंतांला सुचेना. ते ब्राह्मणांना म्हणूं लागले. "निदान मला प्रायश्चित्त तरी द्या." तेव्हां ब्राह्मणांनी चिडून सांगितलें, "तुला प्रायश्चित्त नदींत बुडून मरणांचें!" त्यांना तें खरेंच वाटलें.
आपेगांवपासून खूप दूर प्रयाग शहर आहे. तिथें गंगा व यमुना नद्यांचा संगम आहे. तीं दोघें तिथ आलीं. आणि दिल्या उड्या झोकून त्या पवित्र संगमांत.
आपण मेल्याने मुलें तरी सुखी होवोत ' नवरा-बायको दोघेंहि निघालीं.--कुठें ?
आईबापच नाहींसे झाले. मुक्तेनें निवृत्तीच्या गळांमिठी घातली. ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. मग सगळ्यांनाच रडायला येऊं लागलें. रस्त्यांतून हिंडतांना तीं जाणारायेणाराकडे आपले आई-बाबा यांत भेटतील म्हणून आशेनें बघत. पण देवाघरीं गेलेले आईवडील त्यांना कुठून भेटायला! आपेगांवच्या लोकांना त्यांनीं विनविलें, "आम्हांला शुद्ध करून द्या. आमच्या मुंजी करा ' तेव्हां त्यांनीं त्यांना पैठणला जायला सांगितलें.


म्हणून तीं मुलें पैठणला जायला निघालीं. काट्यां-दगडांतून, नद्यां-डोंगरांतून. पण पैठण खूप लांब होतें.
अखेर पैठण आलें. निवृत्ति-ज्ञानदेवांनीं दोघां भावंडांना बरोबर घेतलें. ते ब्राह्मणांच्या पुढाऱ्यांकडे गेले. हात जोडून म्हणाले. "आम्हांला शुद्ध करून घ्या. आमच्या मुंजी करा." "तुम्हीं संन्याश्याचीं मुलें ना! कांहीं होणार नाहींत तुमच्या मुंजी. शुद्धीहि नाहीं होणार तुमची." उत्तर मिळालें. "–शुद्धी करून काय रेड्याचा माणूस होतो!" कोणी-तरी कुचेष्टेनें म्हणाला. "कां नाहीं होणार!" कोण बोललें म्हणून सगळ्यांनीं चमकून पाहिलें.


तेजस्वी ज्ञानदेवच तें बोलत होता- "सगळ्यांच्या हृदयांत एकच परमेश्वर आहे." त्या कुटाळानें
समोरून चाललेल्या रेड्याला दोन चाबूक लगावले. पण ज्ञानदेवाची पाठ रक्ताळली. "हाहि देवच ना ! मग लाव याला वेद म्हणायला," तो कुटाळ किंचाळला. ज्ञानदेवानें रेड्याच्या डोक्यावर हात ठेवला. रेडा खरोखरच वेद म्हणायला लागला.
तो चमत्कार पाहून लोक थक्क झाले. त्यांना त्या मुलांचें कौतुक वाटलें. त्यांनीं त्यांची मिरवणूक काढली.
मग तीं मुलें आपोआपच शुद्ध ठरलीं. पैठणांतच राहून विद्याभ्यास करूं लागलीं. ज्ञानदेवानें संस्कृत पोथ्या-पुस्तकांचा खूप अभ्यास केला.


ज्ञानदेव वयानें लहान. तरी तो ज्ञानानें खूप मोठा झाला.
तो प्रवचनें करूं लागला. 'भगवद्गीता' ग्रंथ तो लोकांना
समजावून देऊं लागला लोकांना तें आवडलें. पटूं लागलें.
लोक त्याला मोठा म्हणूं लागले. त्या मुलांना वाटूं
लागलें आतां आजोळीं जावें. लगेच सर्व निघालीं
व आळंदीला आलीं. त्यांची प्रसिद्धी
आळंदींतहि पोहोंचली होती तिथेंहि
त्यांना मान मिळाला पण–


विठ्ठलपंताला सुचेना. ते ब्राह्मणांना म्हणूं लागले, "निदान मला प्रायश्चित्त तरी द्या." तेव्हां ब्राह्मणांनी चिडून सांगितलें, "तुला प्रायश्चित्त नदींत बुडून मरणाचें!" त्यांना तें खरेंच वाटलें.
आपेगांवपासून खूप दूर प्रयाग शहर आहे. तिथें गंगा व यमुना नद्यांचा संगम आहे. तीं दोघें तिथ आलीं. आणि दिल्या उड्या झोकून त्या पवित्र संगमांत.
आपण मेल्याने मुलें तरी सुखी होवोत ' नवरा-बायको दोघेंहि निघालीं.--कुठें ?
आईबापच नाहींसे झाले मुक्तेनें निवृत्तीच्या गळांमिठी घातली. ती ओक्साबोक्शीं रडूं लागली. मग सगळ्यांनाच रडायला येऊं लागलें. रस्त्यांतून हिंडतांना तीं जाणारायेणाराकडे आपले आई-बाबा यांत भेटतील म्हणून आशेनें बघत. पण देवाघरीं गेलेले आईवडील त्यांना कुठून भेटायला! आपेगांवच्या लोकांना त्यांनीं विनविलें, "आम्हांला शुद्ध करून घ्या. आमच्या मुंजी करा' तेव्हां त्यांनीं त्यांना पैठणला जायला सांगितलें.



विठ्ठलपंताला सुचेना. ते ब्राह्मणांस म्हणूं लागले, "निदान मला प्रायश्चित्त तरी द्या." तेव्हां ब्राह्मणांनीं चिडून सांगितलें, "तुला प्रायश्चित्त नदींत बुडून मरणाचें!" त्यांना तें खरेंच वाटलें.
आपण मेल्याने मुलें तरी सुखी होवोत ' नवरा-बायको दोघेंहि निघालीं.—कुठें ?
आपेगांवपासून खूप दूर प्रयाग शहर आहे. तिथें गंगा व यमुना नद्यांचा संगम आहे. तीं दोघें तिथ आलीं. आणि दिल्या उड्या झोकून त्या पवित्र संगमांत.
आईबापच नाहींसे झाले. मुक्तेनें निवृत्तीच्या गळांमिठी घातली. ती ओक्साबोक्शीं रडूं लागली मग सगळ्यांनाच रडायला येऊं लागलें. रस्त्यांतून हिंडतांना तीं जाणारायेणाराकडे आपले आई-बाबा यांत भेटतील म्हणून आशेनें बघत. पण देवाघरीं गेलेले आईवडील त्यांना कुठून भेटायला ' आपेगांवच्या लोकांना त्यांनीं विनविलें, "आम्हांला शुद्ध करून घ्या. आमच्या मुंजी करा ' तेव्हां त्यांनीं त्यांना पैठणला जायला सांगितलें.


तेव्हां फार महत्त्व होतें. तिथले ब्राह्मण सांगत तें सर्वजण
म्हणून तीं मुलें पैठणला जायला निघालीं. काट्यां-दगडांतून,
नद्यां-डोंगरांतून. पण पैठण खूप लांब होतें.
अखेर पैठण आलें. निवृत्ति-ज्ञानदेवांनीं दोघां भावंडांना बरोबर घेतलें.
ते ब्राह्मणांच्या पुढाऱ्यांकडे गेले. हात जोडून म्हणाले. " आम्हांला
शुद्ध करून घ्या. आमच्या मुंजी करा." "तुम्हीं संन्याश्याचीं मुलें ना!
कांहीं होणार नाहींत तुमच्या मुंजी. शुद्धीहि नाहीं होणार तुमची."
उत्तर मिळालें. "–शुद्धी करून काय रेड्याचा माणूस होतो!" कोणी-
तरी कुचेष्टेनें म्हणाला. "कां नाहीं होणार?" कोण बोललें म्हणून
सगळ्यांनीं चमकून पाहिलें.


तेजस्वी ज्ञानदेवच तें बोलत होता- "सगळ्यांच्या हृदयांत एकच परमेश्वर आहे." त्या कुटाळानें
समोरून चाललेल्या रेड्याला दोन चाबूक लगावले. पण ज्ञानदेवाची पाठ रक्काळली. "हाहि देवच ना ! मग लाव याला वेद म्हणायला," तो कुटाळ किंचाळला. ज्ञानदेवानें रेड्याच्या डोक्यावर हात ठेवला. रेडा खरो खरच वेद म्हणायला लागला.
तो चमत्कार पाहून लोक थक्क झाले. त्यांना त्या मुलांचें कौतुक वाटलें. त्यांनीं त्यांची मिरवणूक काढली.
मग तीं मुलें आपोआपच शुद्ध ठरलीं. पैठणांतच राहून विद्याभ्यास करूं लागलीं. ज्ञानदेवानें संस्कृत पोथ्या-पुस्तकांचा खूप अभ्यास केला.


ज्ञानदेव वयानें लहान. तरी तो ज्ञानानें खूप मोठा झाला.
तो प्रवचनें करूं लागला. 'भगवद्गीता' ग्रंथ तो लोकांना
समजावून देऊं लागला. लोकांना तें आवडलें. पटूं लागलें.
लोक त्याला मोठा म्हणूं लागले. त्या मुलांना वाटूं
लागलें आतां आजोळीं जावें. लगेच सर्व निवाली
व आळंदीला आलीं. त्यांची प्रसिद्धी
आळंदींतहि पोहोंचली होती. तिथेंहि
त्यांना मान मिळाला. पण–


आळंदींत त्यावेळीं विसोबा नांवाचा माणूस होता. मोठा मत्सरी. तीं रस्त्यांत दिसलीं कीं यांना खाऊं का गिळूं असें त्याला होई!
दसऱ्याचा मण होता. निवृत्तिनाथांना वाटलें आज मांडे खावेत. मुक्ता मांड्यांसाठीं खापर आणायला कुंभाराकडे गेली. वाटेंत विसोबा तिला भेटला. त्यानें एकटी पाहून तिला मारलें.
ती रडतरडतच कुंभाराकडे गेली. विसोबाहि आला. त्यानें कुंभाराला दरडावलें, "खबरदार हिला खापर विपर देशील तर!" कुंभार म्हणाला, "नाहीं, देवा नाहीं देत." मुक्ता हिरमुसली. तशीच घराकडे परतली. ज्ञानदेवांनीं विचारलें, "कां ग हिरमुसलीस?" तिनें हकीगत सांगितली. "हात्तिच्या एवढेंच ना!" ते हात टेकून ओणवे झाले. "कर माझ्या पाठीवर मांडे." त्यांच्या पोटांतला अग्नि जळूं लागला. तापल्या पाठीवर मांडे तयार होऊं लागले. विसोबानें तें पाहिलें तो पस्तावला





हीं चारी भावंडे पुढें फिरत फिरत नेवाश्याला आलीं. गांवांत येतात तो कळलें कीं. गांवचा कुळकर्णी नुकताच वारला आहे. त्याचें नांव होतें 'सच्चिदानंद.'


ज्ञानदेव हंसून म्हणाले. "'सच्चिदानंद' कसा मरेल!" ते त्या घरीं गेले. मेलेल्या त्या माणसावरून त्यांनीं हात फिरविला. माणूस जिवंत झाला. त्याच्या बायकोला फार आनंद झाला.









मग तीं नवराबायको ज्ञानदेवांच्या पायां पडलीं. ज्ञानदेवांनीं तिथें एक मोठें पुस्तक लिहिण्याचें ठरविलें. सच्चिदानंद तें लिहून घेऊं लागले. 'ज्ञानेश्वरी' हें तें पुस्तक. फार पूर्वी कौरव-पांडवांची मोठी लढाई झाली. पांडवांतला अर्जुन सुरवातीला बावचळला. त्याचा रथ श्रीकृष्ण हांकीत होते. त्यांनीं त्याला उपदेश केला. तीच 'भगवद्गीता.' तिचा अर्थ मराठी भाषेंत सोपा करून सांगितला ज्ञानदेवांनीं. तीच ज्ञानेश्वरी ही लिहिली तेव्हां ज्ञानदेवांचे ज्ञानेश्वर झाले.





मग ज्ञानेश्वर तीर्थयात्रेला निघाले. पंढरपूरला ते नामदेवांना भेटले. हे शिंपी जातीचे थोर संत होते.
नामदेवांनी त्यांच्या पायावर डोकें ठेविलें. ज्ञानेश्वरांनी त्यांना प्रेमानें मिठी मारली. मग तेहि तीर्थयात्रेला निघाले. इतरहि बरेच संत त्यांच्याबरोबर होते.
कऱ्हाडला रामराय सावकार होता. त्याचा साधुसंतांवर फार राग. त्याची बायको सीताबाई संतांची सेवा करणारी. तिच्या मनांत आलें, संतांना जेवण घालावें. पण तें कसें घडणार ?
इतक्यांत रामरायाचा मुलगा मेला. सीताबाई म्हणाली, ''संतांना शिव्या दिल्यात म्हणून असें झालें. त्यांना गांवांत आणा. त्यांची क्षमा मागा. म्हणजे मुलगा उठेल.'' रामराय दुःखानें गांगरला होता. त्यानें संतांना सन्मानानें गांवांत आणलें. त्यांची क्षमा मागितली. ज्ञानेश्वर म्हणाले ''तुमचा मुलगा तर जिवंतच आहे! पाहा.'' मुलगा खरोखरच जिवंत झालेला. ज्ञानेश्वरांची शक्ति सर्वांना दिसली.


पुढें हे संत तेरगांवीं आले. तेथें गोरा कुंभार संत होते. त्यांना घेऊन ते पुढें निघाले.
संत मंडळी सातपुडा पर्वतांत आली. दाट जंगल. त्यांत चोर, लुटारू. त्यांनला हरपाल या संतांना भेटला. त्यानें सर्वांना सुखरूप जंगलांतून पलीकडे पोहोंचविलें.
संत उज्जयिनींत आले. तेथें वीरमंगळ ज्योतिषी तप करीत होता. त्यानें ज्ञानेश्वरांचा उपदेश घेऊन लगेच प्राण सोडला. ज्ञानेश्वरांनी त्याची समाधि बांधली.
संत प्रयागला पोहोचले. तिथें एक मोठा यज्ञ व्हावयाचा होता. मोठमोठे विद्वान ब्राह्मण जमले होते. यज्ञांत मुख्य मान कोणाला द्यावयाचा याबद्दल भांडण लागलें. म्हणून एका हत्तिणीच्या सोंडेंत माळ दिली. हत्तीण ज्याच्या गळ्यांत ती माळ घालील त्याचा पहिला मान असें ठरलें. ज्ञानेश्वर इतर संतांसह जवळच उभे होते. हत्तिणीनें त्यांच्याच गळ्यांत ती माळ घातली.


त्याकाळी चांगदेव योगी
त्यांची योगाची शक्ति फार मो
एकदां एक पैठणचा ब्राह्मण त्यांच
कडे आला. त्यानें चांग
ज्ञानेश्वरांची थोरवी सांगित
त्यांनीं रेड्याकडून वेद म्ह
विल्याचा चमत्कार सांगितला.
चांगदेव शंकराची भक्ति करीत.
त्यांच्यापाशीं फार मोठी शक्ति
होती. त्यांना सर्व विद्या येत.
ते १४०० वर्षांचे होते. त्यामुळें
त्यांना गर्व झाला होता.
ज्ञानेश्वरांचा मोठेपणा ऐकून ते
रागावले. ‘माझ्यापेक्षां मोठा कोण
असणार !’ ते मनाशीं म्हणाले;
तरीपण त्यांनीं ज्ञानेश्वरांना
भेटण्याचें ठरविलें.


चांगदेवांनीं ज्ञानेश्वरांना एक पत्र पाठविलें. तें घेऊन त्यांचा शिष्य
ज्ञानेश्वरांकडे आला. ‘ज्ञानेश्वर म्हणजे कोण पोर’ आपण थोरांनीं
पोराला काय लिहावें ’’ असें वाटलें होतें चांगदेवांना म्हणून
त्यांनीं कोरेंच पत्र धाडलें होतें ते कोरें पत्र मुक्ताबाईंनीं पाहिलें.
ती म्हणाली. ’’ चौदाशें वर्षें जगला तरी अजून कोराच !’
शिष्य परत गेला. मग चांगदेव यायला निघाले ज्ञानेश्वरांकडे


मोठ्या ढाण्या वाघावर चांगदेव बसले. हातांत चाबूक म्हणून साप घेतला. बरोबर १४०० शिष्य. आणि निघाले ज्ञानेश्वरांच्या भेटीला. त्यांना वाटत होतें, आपली ही शक्ति पाहून ज्ञानेश्वर आपल्याला मोठा म्हणतील. पण पाहातात तों काय? आकाशांतून एक पडकी भिंत उडत येत होती. त्या भिंतीवर बसले होते ज्ञानेश्वर आणि निवृत्तिनाथ, सोपान व मुक्ताबाई. ज्ञानेश्वरांची ती अचाट शक्ति पाहून चांगदेवांचा गर्व गळून गेला. ते ज्ञानेश्वरांना शरण गेले. ज्ञानेश्वरांनी त्यांना उपदेश केला. ती 'चांगदेवपासष्टी.'


शके १२१८ चा कार्तिक महिना आला. ज्ञानेश्वर बावीस वर्षांचे
त्यांनी आळंदी येथें जिवंत समाधि घेतली. तो दिवस वद्य ३ गुरु.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
था. क. 6002 नों. दि ..........
वि. वाचनालय ......... क. ..................

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
था. क. [illegible] नों. दि ..........
वि. ... क. ..................

IRBK-0107002